# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १०/०६/२०२४ (सोमवार) दुपार


## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

दिनांक १०/०६/२०२४ रोजीचे ००/३० वा. ते ०१/१० वा. दरम्यान पोस्टे मौदा येथील स्टाफ पो. स्टे. मौदा हद्दीत स्टाफसह अवैध गोवंश वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना भंडारा कडुन नागपूर च्या दिशेने NH-53 महामार्गाने ट्रक क्र. MH-31/DS-7786 तसेच महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. MH-49/AT -6054 मधून अवैधरित्या निर्दयतेने गोवंश जनावरांची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्याने नमूद दोन्ही वाहनांना नाकाबंदी करून मौजा मारोडी शिवारात पकडून पाहणी केली असता ट्रक क्र. MH-31/DS-7786 मध्ये २० गोवंशिय जनावरे तसेच महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. MH-49/AT -6054 मध्ये ६ गोवंशिय जनावरे अत्यंत निर्दयतेने कोंबून, आखूड दोरखंडाने बांधुन व जनावरांची चारापाण्याची कोणतीही व्यवस्था न करता कत्तली करिता घेऊन जातांना मिळून आल्याने ट्रक चालक नामे– सय्यद फारुख वल्द सय्यद रशीद वय ३३ वर्ष रा. भाजीमंडी, कामठी, क्लीनर जमील कदीर खान वय २५ वर्ष व मजूर रेहान इक्बाल कुरेशी, वय ३० वर्ष दोन्ही रा. टेकानाका, नागपूर त्याचप्रमाणे बोलेरो पिकअप चा चालक प्रकाश महादेव बोरकर वय ३६ वर्ष व मयूर नत्थूजी देशमुख वय २१ वर्ष दोन्ही रा. खराडा पुनर्वसन ता. मौदा यांना ताब्यात घेऊन त्याचे ताब्यातून एकूण २६ गोवंशिय जनावरे किंमती ५,२०,०००/– रू, ट्रक क्र. MH-31DS-7786 कीं २५,००,०००/–रू. महेंद्रा बोलेरो पिकअप क्र. MH-49/AT -6054 कीं. ८,००,०००/– रु. तसेच आरोपीतांचे चार वेगवेगळया कंपनीचे मोबाईल फोन किंमती ९०,०००/– रू. असा एकूण ३९,१०,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर वाहना मधील गोवंशिय जनावरांना योग्य व्यवस्थापनार्थ गोरक्षण केंद्र भंडारा येथे दाखल करण्यात आलेले आहे. गुन्ह्यातील आरोपीतांना अटक करण्यात आली असून त्यांचे विरुद्ध कलम ११(१) (d) (f) (e) प्रा. छळ प्रति. अधि. १९६० सहकलम ५ अ (१),९ महा. प्रा. सं. अधि. १९७६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी विभाग, ठाणेदार पो.नि. सतीशसिंह राजपूत, पो.उपनी महेश बोथले पो. हवा. संदीप कडू, पो. हवा. गणेश मुदमाळी, पो.हवा. रुपेश मुदमाळी, पो.ना. दिपक दरोडे, पो.अ. अतिश गाढवे यांनी केली.




पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर